**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी सूचना दिलेली आहे. मी त्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची संधी देत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील शेतकरीवर्ग आज या सभागृहाच्या कामकाजाकडे डोळे लावून बसला आहे. महाराष्ट्रामध्ये पेरण्या होऊन जवळजवळ 22 दिवस पाऊस पडलेला नाही. मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांमध्ये दुबार, तिबार पेरण्या झालेल्या आहेत. मागील वर्षी दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. जे काही पिकले त्याला योग्य भाव मिळाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण वाढत आहे. शासनाकडून जे काही आर्थिक स्वरूपातील अनुदान देण्याचा प्रयत्न झाला ते अनुदान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नाही, त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. 22 दिवसापूर्वी पेरण्या करूनही पावसाअभावी पुन्हा एकदा राज्यातील शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकट ओढवले आहे. आज या निमित्ताने शासन त्यांच्या पदरात काय टाकणार आहे याकडे त्यांचे लक्ष लागले आहे.......(अडथळा).....सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. माझी शासनाला विनंती आहे की, महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी.

(सभागृहात अनेक माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत असतात)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपण माननीय विरोधी पक्षनेत्यांना म्हणणे मांडण्याची संधी दिली आहे. पहिल्यांदा शोकप्रस्तावाचा विषय असल्यामुळे शोकप्रस्तावाला सुरुवात करावी. हा विषय थोडक्यात मांडता येण्यासारखा आहे. माननीय सदस्यांना चर्चेला सुरुवात करावयाची आहे का, आपण चर्चेला परवानगी दिली आहे का?

**सभापती** : मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभागृहाची बैठक दुपारी 1.03 ते 1.13 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** गट नेत्यांच्या बैठकीमध्ये जे काही ठरले होते त्याची माहिती सर्वांना आहे. त्यानंतर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मला बोलावयाचे आहे अशा प्रकारची सूचना केली. औपचारिकरित्या नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना माझ्याकडे अजून आलेली दिसत नाही. गट नेत्यांनी देखील तेच सांगितले आहे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी देखील विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना एक-दोन मिनिटे बोलण्यास अनुमती द्यावी असे सांगितले. त्यामुळे मी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेवर नव्हे तर एका महत्वाच्या विषयावर अपवाद म्हणून बोलण्यास अनुमती देत आहे. त्यानंतर मी माझा निर्णय जाहीर करणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या व जिव्हाळ्याच्या प्रश्नावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना माननीय विरोधी पक्ष नेते व मी आपणाकडे स्वत: दिलेली आहे. या पाठीमागे तीव्रता आहे, गांभीर्य आहे....

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

आपल्या निर्णयाशी सर्व सहमत असतात. आज शेतकऱ्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. शेतकरी कर्जबाजारी झाला आहे.

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्रीएकनाथराव खडसे : सभापती महोदय, या विषयावर चर्चा करण्याची माझी तयारी आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, मी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना बोलण्यास अनुमती दिली आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विरोधी पक्षाची नियम 289 अन्वये सभागृहापुढील कामकाज स्थगित करून या विषयावर चर्चेची मागणी असेल तर चर्चा करण्यास माझी आता तयारी आहे. विरोधी पक्षाचा शोक प्रस्तावाला विरोध आहे असे दिसते. त्यांचा विरोध त्यांच्याकडेच राहू द्यावा. नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेच्या प्रस्तावावर प्रॉयॉरिटीने चर्चा घ्यावी अशी त्यांची मागणी असेल तर त्यावर चर्चा करण्याची माझी आता तयारी आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती :** मी सभागृहाची बैठक पाच मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.16 ते 1.21 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

......

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या संदर्भात मी गांभीर्याने विचार मांडत असताना......

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण ज्यावेळेस एखाद्या सन्माननीय सदस्याला बोलण्याची अनुमती देता त्यावेळेस जोपर्यंत आपण सन्माननीय सदस्याला बोलण्याचे थांबवत नाही तापर्यंत त्या सन्माननीय सदस्याचा माईक सुरु असतो. या ठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. माणिकराव ठाकरे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात विचार मांडत असताना त्यांचा माईक अचानक बंद करण्यात आला. माईक बंद करण्याचा आदेश दिल्याबरोबर विरोधी पक्षाचा माईक बंद करुन सत्ताधारी पक्षाचा माईक सुरु करण्यात आला. सन्माननीय सदस्य बोलत असताना माईक बंद करणे हा आपल्या खुर्चीचा अवमान आहे. आज पर्यंत या सभागृहात असा प्रकार कधीही झाला नव्हता. खरे म्हणजे एक प्रकारे हा विरोधी पक्षाचा अवमान आहे. या सभागृहात सत्ताधारी पक्षाकडून विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्याच्या संदर्भात मी गांभीर्याने विचार मांडत असताना माझा माईक अचानक बंद करण्यात आला त्यामुळे या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली असून या विषयाचे गांभीर्य ओळखून आपण त्यावर मला विचार मांडण्याची संधी दिल्यामुळे मी आपला आभारी आहे. आज शेतकऱ्यांची अवस्था फार गंभीर झालेली आहे. आज शेतकऱ्यांना कर्जसुध्दा मिळू शकत नाही त्यामुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळाली पाहिजे अशी आम्ही मागणी करीत आहोत. शासनाने प्रथम शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफीची घोषणा या सभागृहात करण्याची आवश्यकता आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी बाहेर घोषणा केली आहे की, "आम्ही शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ शकत नाही." त्यामुळे या सभागृहात प्रथम शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीची घोषणा करुन या विषयावरील चर्चेला सुरुवात करावी अशी विनंती करतो. चर्चा सुरु होण्याच्या अगोदर शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीची शासनाने सभागृहात घोषणा करावी.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**सभापती :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.23 ते 1.33 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : माझी सभागृहाच्या नेत्यांना विनंती आहे की, त्यांनी शोक प्रस्ताव मांडावा.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की,...

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**सभापती** : मी निर्देश दिलेले आहेत. सभागृहाच्या नेत्यांनी शोक प्रस्ताव मांडावा. कृपया शोक प्रस्तावाचे गांभीर्य घालवू नका.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माझी आपणास पुन्हा विनंती आहे की, आपण मला बोलण्याची संधी द्यावी. या सरकारची चर्चेची तयारी आहे, हे मी अगोदर सांगितलेले आहे. विरोधी पक्षाच्या विनंतीनुसार आता चर्चेला सुरुवात करावी त्यानंतर शोक प्रस्ताव घ्यावा. विरोधी पक्षाची चर्चेची मागणी आहे तेव्हा आता चर्चेला सुरुवात करावी. सरकारची चर्चेला तयारी आहे. तेव्हा आपण चर्चेला सुरुवात करावी अशी माझी मागणी आहे. विरोधी पक्षाला शोक प्रस्ताव नको आहे.विरोधी पक्षाला शोक प्रस्तावाचे गांभीर्य नाही. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे सरकारची चर्चेची तयारी आहे. या क्षणापासून चर्चा करावी. .

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याच प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : माझी सभागृहाच्या नेत्यांना विनंती आहे की, त्यांनी शोक प्रस्ताव मांडावा.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना त्यांच्या जागेवर बसण्यास सांगावे. आपण विरोधी पक्षाच्या सदस्यांना येथे बॅनर लावण्याची परवानगी दिली आहे काय ? या ठिकाणी बॅनर लावला आहे हे सचिवांना माहीत आहे पण ते शांतपणे पाहत आहेत.

**सभापती** : सभागृहातील बॅनर काढून टाकण्यात यावेत.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** शोक प्रस्ताव

**मु.शी.:** श्री गोविंदराव वामनराव आदिक, डॉ.बळीराम वामन हिरे, प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री शांताराम पांडुरंग करमळकर, शिवाजीराव मारूतराव पाटील, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.एकनाथराव खडसे ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, श्री गोविंदराव वामनराव आदिक, डॉ.बळीराम वामन हिरे, प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री शांताराम पांडुरंग करमळकर, शिवाजीराव मारूतराव पाटील, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री गोविंदराव वामनराव आदिक, डॉ.बळीराम वामन हिरे, प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री शांताराम पांडुरंग करमळकर, शिवाजीराव मारूतराव पाटील, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते. "

कै.गोविंदराव वामनराव आदिक यांचा जन्म दिनांक 4 जानेवारी, 1939 रोजी अहमदनगर जिल्ह्यात श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., एलएल.बी.पर्यंत झाले होते.

कै.आदिक यांनी अहमदनगर जिल्हा विद्यार्थी संघ, श्रीरामपूर एज्युकेशन सोसायटी, अशोक एज्युकेशन संस्था, अशोकनगर ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे संस्थापक, मुळा-प्रवरा इलेक्ट्रिक को-ऑपरेटिव्ह सोसायटी व महाराष्ट्र राज्य शेतकरी-शेतमजूर संघटनेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सूतगिरणी कामगार संघ व महाराष्ट्र राज्य साखर कामगार संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष तसेच अहमदनगर जिल्हा कबड्डी फेडरेशन, समाज सेवा मंडळ व जीवन साधना सांस्कृतिक संस्थेचे संस्थापक, साप्ताहिक श्रीरामपूर टाईम्सचे विश्वस्त व दैनिक "विशाल सह्याद्री"चे संपादक म्हणूनही कार्य केले होते.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

कै.आदिक यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष, एस.टी. कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष, इंडियन नॅशनल ट्रेड युनियनचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषी व औद्योगिक विकास महामंडळाचे सदस्य, राष्ट्रीय किसान सभेचे अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस, विनायक सहकारी साखर कारखान्याचे संचालक, गोदावरी सहकारी साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक म्हणूनही कार्य केले होते. महाराष्ट्र राज्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी तसेच अनेक कामगार संघटनांशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांनी शेतकरी, शेतमजूर व असंघटीत कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी विशेष योगदान दिले होते.

कै.आदिक सन 1972, 1978 व 1980 असे तीन वेळा अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. सन 2000 आणि 2006 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवरही निर्वाचित झाले होते. त्यांनी सन 1978-79 या काळात महाराष्ट्र राज्याचे पाटबंधारे आणि लाभक्षेत्र विकास, माहिती व जनसंपर्क खात्याचे मंत्री तसेच सन 2003-2004 या कालावधीत कृषी, विधी व न्याय खात्याचे मंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते. तसेच, ते सन 1993 व 2009 असे दोन वेळा राज्यसभेवरही निर्वाचित झाले होते. संसदेच्या अनेक सल्लागार समित्यांचे सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले होते. उत्कृष्ट संसदपटू व एक अभ्यास लोकप्रतिनिधी अशीच त्यांची ख्याती होती.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे रविवार, दिनांक 7 जून, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

कै.डॉ.बळीराम वामन हिरे यांचा जन्म 16 डिसेंबर, 1931 रोजी नाशिक जिल्ह्यात मालेगाव तालुक्यातील निमगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण एमबीबीएस पर्यंत झाले होते.

कै.डॉ.हिरे यांनी नाशिक जिल्ह्यातील विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष, निमगाव येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन, भाऊसाहेब हिरे स्मारक समितीचे अध्यक्ष, मालेगाव शेतकरी सहकारी संघाचे सदस्य, गिरणा सहकारी साखर कारखान्याचे व नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले होते. नाशिक जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

कै.डॉ.हिरे सन 1972, 1978 व 1980 असे तीन वेळा नाशिक जिल्ह्यातील दाभाडी मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. सन 1990 मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर राज्यपालांद्वारा नामनियुक्त झाले होते. त्यांनी मार्च 1978 ते मार्च 1985 या काळात शिक्षण, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पर्यटन, फलोत्पादन, ऊर्जा, दारुबंदी व राज्य उत्पादन शुल्क इत्यादी खात्यांचे मंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 11 एप्रिल, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

कै.प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील यांचा जन्म 25 जून, 1957 रोजी सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते.

कै.मोहिते-पाटील यांनी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष, जनसेवा युवक संघटनेचे संस्थापक, श्रीमती रत्नप्रभा मोहिते-पाटील सहकारी पतसंस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, धनश्री महिला सहकारी पतसंस्था व महिला कामगार संघटना, अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी बँकेचे अध्यक्ष, सदाशिव नगर येथील शंकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे संचालक, महाराष्ट्र विद्युत महामंडळाचे सदस्य, महाराष्ट्र राज्य साखर संघाचे संचालक, सोलापूर जिल्हा परिषदेचे सदस्य व 1992-97 या कालावधीत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते. सोलापूर जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूरला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. अकलूज-माळशिरस परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी व जनमाणसातील लोकनेते अशीच त्यांची प्रतिमा होती.

कै.मोहिते-पाटील 1998 व 2004 असे दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. तसेच त्यांनी मे, 1998 ते जुलै, 1999 या काळात सहकार खात्याचे राज्यमंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते. तसेच, ते सन 2004 मध्ये सोलापूर मतदारसंघातून लोकसभेवरही निर्वाचित झाले होते.

अशा या उमद्या नेत्याचे सोमवार, दिनांक 6 जुलै, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

कै.शांताराम पांडुरंग करमळकर यांचा जन्म 24 ऑगस्ट, 1924 रोजी बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण डी.ए.एस.एफ. (आयुर्विद्या विशारद ) पर्यंत झाले होते.

कै.करमळकर यांनी भारतीय विद्यामंदिर हिंगोली, बहि:शाला शिक्षण मंडळ, तसेच आदर्श गणेश मंडळाचे अध्यक्ष, समर्थ ग्राहक संघटनेचे सदस्य, लोकनायक जयप्रकाश नारायण अमृत महोत्सव समितीचे सेक्रेटरी, तसेच महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

कै.करमळकर यांनी हिंगोली नगरपरिषदेचे सदस्य, भारतीय जनसंघाचा पूर्णवेळ कार्यकर्ता, राष्ट्रीस स्वयंसेवक संघाचे कार्यवाह, सोलापूर जिल्ह्याचे प्रचारक, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस म्हणूनही कार्य केले होते. तसेच पक्षाच्या अनेक आंदोलनाचे नेतृत्वही त्यांनी केले होते. ते भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै.करमळकर सन 2000 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे सोमवार, दिनांक 15 जून, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

कै.शिवाजीराव मारूतराव पाटील यांचा जन्म 12 नोव्हेंबर, 1929 रोजी बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.बी.टी. पर्यंत झाले होते.

कै.पाटील यांनी अनेक वर्षे रयत शिक्षण संस्थेमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अध्यापनाचे कार्य केले. या काळात त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने महाळुंगे-पडवळ व हडपसर, जिल्हा पुणे तसेच विंचूर, जिल्हा नाशिक येथे माध्यमिक शाळांच्या इमारती उभ्या केल्या, तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे व महाराष्ट्र राज्य शिक्षण सुधार सल्लागार समितीचे सदस्य, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, पुणे विद्यापीठाच्या विधी सभेचे सदस्य, ऑल इंडिया फेडरेशन ऑफ हेडमास्टर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ व महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते. पुणे जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै.पाटील 1984 मध्ये पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 9 जून, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सर्वश्री गोविंदराव वामनराव आदिक, डॉ.बळीराम वामन हिरे, प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील, माजी वि.प.स. व मंत्री तसेच सर्वश्री शांताराम पांडुरंग करमळकर, शिवाजीराव मारूतराव पाटील, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.गोविंदराव वामनराव आदिक, माजी मंत्री हे दोन वेळा या सभागृहाचे सदस्य राहिले. राज्य मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणूनही त्यांनी चांगले काम केले. शेती, कामगार, सहकार, प्रशासन या सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या एका ज्येष्ठ नेत्याला आपण सर्वजण मुकलो आहोत. विधिमंडळात आणि संसदेमध्ये लोकांच्या प्रश्नांची प्रभावीपणे बाजू मांडणारे प्रतिनिधी म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती. साहित्य, कला, नाट्य, संगीत या बाबतीत विशेष आस्था असणारे कै.गोविंदराव आदिक हे संस्कारक्षम राजकारणी, कुशल संघटक, अभ्यासू आणि प्रभावशाली वक्ते होते. स्व.यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतरावजी नाईक यांच्या विचारांचा मोठा पगडा असणारे कै.गोविंदरावजी आदिक साहेब, यांची युवक तसेच ज्येष्ठांसोबत संवाद साधण्यात फार मोठी हातोटी होती. राजकीय असो, कृषी असो वा कामगार क्षेत्र असो, या क्षेत्रांशी संबंधित असलेल्या प्रश्नांवर त्यांनी केवळ भाषणे केली नाहीत तर, या महाराष्ट्रात फार मोठा संघर्ष उभा केला. सभापती महोदय, जिद्द आणि सचोटीच्या जोरावर यश संपादन केले जाते, हे कै.गोविंदराव आदिक साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल. म्हणूनच आमच्यासारख्या आजच्या नवीन पिढीला कै.गोविंदराव आदिक नेहमीच आदर्श वाटतात. मुंबईतील श्रीराम मिलचा प्रश्न असो किंवा श्रीरामपूर येथील साखर कारखान्याचे सूत गिरणीत रुपांतर करण्याचा प्रश्न असो, त्यांनी नेहमीच कामगारांचे भले करण्याचा ध्यास घेतला होता. कै.आदिक यांच्यामध्ये घेतलेला निर्णय अंमलात आणण्याची क्षमता होती. आजची पीक योजना ही त्यांच्याच संकल्पनेतून पुढे आलेली आहे. विधापरिषदेचे सदस्य, राज्यसभेचे सदस्य, राज्याचे कृषी, विधी व न्याय विभागाचे मंत्री यासह विविध खात्याचे मंत्री, विविध शैक्षणिक संस्था, शेती संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शेतमजूर संघटनांचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. शेतकरी, शेतमजूर, असंघटीत कामगार आणि

..4..



श्री.धनंजय मुंडे....

सामान्य लोकांसाठी त्यांनी केलेले कार्य निश्चितच महाराष्ट्राच्या कायम स्मरणात राहील. कै.गोविंदराव आदिक यांचे चिरंजीव श्री.अविनाश आदिक यांच्यामुळे माझ्या कुटुंबाचे आणि आदिक कुटुंबाचे फार जवळचे संबंध होते. महाराष्ट्राने कै.गोविंदराव आदिक यांच्या रुपाने मोठा नेता गमविला आहे. अशा या ज्येष्ठ व्यक्तिच्या निधनाबद्दल मी स्वतःच्या, विरोधी पक्षाच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै.डॉ.बळीराम वामन हिरे, वि.प.स. व माजी मंत्री, हे मागील पाच दशके राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रात कार्यरत होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने जनसामान्यांच्या सेवेत धन्यता मानणारे एक चांगले व्यक्तिमत्त्व गमविले आहे. नाशिक जिल्ह्यातील दाभाडी मतदारसंघातून तीन वेळा विधानसभेवर आणि 1990 मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर राज्यपालांद्वारा नामनियुक्त झाले होते. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री यासह विविध विभागाचे मंत्री म्हणून त्यांनी अतिशय उत्कृष्ट काम केले आहे. डॉक्टर म्हणून त्यांनी गोरगरीब जनतेची निस्वार्थपणे सेवा केली. राजकारणासह शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या निधनाने आपण राजकीय व सामाजिक क्षेत्रात दीर्घकाळ काम केलेल्या एका ज्येष्ठ व्यक्तिमत्त्वास मुकलो आहोत. अशा या अभ्यासू आणि जनमाणसातील लोकनेता असलेल्या ज्येष्ठ नेत्याच्या दु:खद निधनाबद्दल मी विरोधी पक्षाच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै.प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील, माजी वि.प.स. व मंत्री यांनी या सभागृहात दोन टर्म सदस्य म्हणून काम केले. समाजकारणात आणि राजकारणात आपल्या दिलदार, मनमिळाऊ आणि धाडसी स्वभावामुळे त्यांनी एक वेगळा ठसा उमटविलेला आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

एक उमदे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. तरुण वयापासून हे नेतृत्व घडले आणि स्वत: घडत असताना असंख्य कार्यकर्तेही ज्यांनी घडविले, त्यांचे नाव कै. प्रतापसिंह मोहिते-पाटील आहे असे आपल्याला म्हणता येईल. युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, विधानपरिषदेचे सदस्य, राज्याचे मंत्री, लोकसभेचे सदस्य म्हणून त्यांनी आपले नेतृत्वाचे गूण राज्यातीलच नव्हे तर देशातील सार्वभौम सभागृहातही दाखविले. कै. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांना लाडाने सर्वजन पप्पा म्हणायचे. ते सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. सोलापूर जिल्हा परिषद अठ्ठाविसाव्या क्रमांकांवर होती. ते सोलापूर जिल्हापरिषदेचे अध्यक्ष झाल्यानंतर एक वर्षाच्या आत सोलापूर जिल्हा परिषद दुसऱ्या क्रमांकावर आली आणि ती कै. प्रतापसिंह मोहिते-पाटील साहेबांनी आणली. खरोखर त्यांच्या या कामाची इतिहासात नोंद होईल. राज्याचे सहकार राज्यमंत्री म्हणून मी त्यांचे काम जवळून पाहिले आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या व सहकार क्षेत्राच्या संदर्भात त्यांच्या मनामध्ये अतिशय तळमळ होती, मनात तळमळ असणारे ते नेतृत्व होते. राज्यातील साखर कारखानदारीला नक्कीच वेगळ्या वळणावर सहकार राज्यमंत्री असताना त्यांनी आणले. सहकार राज्यमंत्री म्हणून महत्वपूर्ण निर्णय सुध्दा त्यांनी घेतलेले आहेत. आजच्या काळात कार्यकर्ता तयार करणे हे अतिशय अवघड काम आहे. मात्र त्यांनी स्थापन केलेली जनसेवा संघटना कार्यकर्ते तयार करण्याची फॅक्टरी होती. विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत आणि वाटचालीत त्यांचा मोलचा वाटा होता. श्रीक्षेत्र शिंगणापूरला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देणे, अकलुज माळशिरज परिसराचा सर्वांगीण विकास करणे यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. सन 2010 मध्ये ते या सभागृहाचे सदस्य म्हणून निवृत्त झाले. माझा व त्यांच्या कुटुंबाचा जवळचा संबंध आहे. मला आठवते की, भारतीय जनता पार्टीने कै. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांना सोलापूर लोकसभेची उमेदवारी दिली. मी त्या पक्षात युवक संघटनेचा जबाबदार कार्यकर्ता म्हणून काम करीत होतो आणि ते काम करताना अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाची जबादारी माझ्यावर होती. लोकसभेमध्ये ते विजयी व्हावेत म्हणून कार्यकर्ता म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली आहे. आपण असे उमदे, धाडसी व राजबिंडे नेतृत्व गमाविले आहे. मी कै. प्रतापसिंह मोहिते-पाटील साहेबांना विधानपरिषदेचा विरोधी पक्षनेता नात्याने सर्व



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

विरोधी पक्षांच्या वतीने तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै. शांताराम बापू करमळकर हे सभागृहाचे माजी सदस्य होते आणि ज्यांच्या निधनामुळे आपण एक ज्येष्ठ मार्गदर्शक गमाविला आहे. आमच्या मराठवाड्यातील हिंगोली येथील असणारे करमळकर बापू हे नेहमीच कार्यकर्ते घडवित होते. मी पुण्याला शिकायला होतो. मी अनेकदा पुण्यात त्यांच्या घरी जाऊन त्यांच्याकडून मार्गदर्शन घ्यायचो. नेता होण्याच्या अगोदर कार्यकर्ता व्हावे लागते आणि नेता झाले तरी कार्यकर्त्यांच्या अंगातील गूण नेत्यांनी कमी करू द्यायचे नाहीत असे ते सांगायचे आणि ती शिकवण त्यांच्या काळात मला मिळाली आहे. त्या काळात त्यांनी कार्यकर्ते उभे केले आणि त्यातील काही कार्यकर्ते राज्याचे नेते झाले असल्याचे आपण पाहत आहोत. सन 1950 मध्ये वैद्यकीय अभ्यासाबरोबर जनसंघाच्या कार्याला वाहून घेणाऱ्या, वयाच्या पंचविसाव्या वर्षापासून प्रचारक म्हणून काम करणाऱ्या बापूंनी त्यांच्यातील संशोधनशील कार्यशैलीमुळे अनेक नवीन कार्यकर्ते जोडले, त्या कार्यकर्त्यांना तयार करण्याचे कामही त्यांनी केले. सदैव चांगल्या कार्यकर्त्यांच्या शोधात असलेल्या संघटनेसाठी संपूर्ण, समर्पित भावाने कार्य करणारे ते एक ज्येष्ठ निस्वार्थी मार्गदर्शक होते. मी कै. शांताराम बापूंना विधानपरिषदेचा विरोधी पक्षनेता या नात्याने सर्व विरोधी पक्षांच्या वतीने तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै. शिवाजीराव मारुतराव पाटील हे या सभागृहाचे माजी सदस्य होते. आपण त्यांच्या निधनामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या ज्येष्ठ मार्गदर्शकाला मुकलो आहोत. रयत शिक्षण संस्थेमध्ये अध्यापनाचे कार्य करण्याबरोबरच ग्रामस्थांच्या मदतीने म्हाळुंगे, पडवळ व हडपसर, जिल्हा पुणे तसेच नाशिक जिल्हा येथे शाळांच्या उभारणीचे फार मोठे काम त्यांनी केले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा परीक्षा मंडळ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे, महाराष्ट्र राज्य शिक्षण सुधार सल्लागार समितीचे सदस्य, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, पुणे विद्यापीठाच्या विधीसभेचे सदस्य म्हणून विविध शैक्षणिक संस्थ्ांमध्ये त्यांनी उल्लेखनीय काम केले. विधानपरिषदेत शिक्षक व शिक्षणाच्या प्रश्नांबाबत ते नेहमी पोटतिडीकीने भांडत होते. शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारे अशा या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

ज्येष्ठ सदस्यांना मी विधानपरिषदेचा विरोधी पक्षनेता या नात्याने सर्व विरोधी पक्षांच्या वतीने तसेच राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि या सर्व दिवंगत नेत्यांच्या आत्म्यांस चिरशांती लाभो एवढी प्रार्थना करतो. धन्यवाद !

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सदनाच्या सन्माननीय नेत्यांनी सदनात मांडलेल्या शोकप्रस्तावावर भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

कै. गोविंदराव वामनराव आदिक यांच्या संदर्भात सर्वच सन्माननीय सदस्यांच्या मनात भावना आहेत. मी त्यांनी केलेल्या कार्याची माहिति सदनाला सांगून काही अधिक माहिती देत आहे अशातील भाग नाही. सुरुवातीपासून संपूर्ण महाराष्ट्रातील राजकीय जडणघडणींमधील त्यांचा वाटा सर्वांना माहीत आहे. कै. गोविंदराव आदिक साहेबांचे कर्तृत्व कधीही लपून राहिलेले नाही. त्यांनी वकिलीचे शिक्षण घेतले. ते विधानसभेत पहिल्यांदा निवडून आले तेव्हापासून तरुण वयातील एक तडफदार कार्यकर्ता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. संपूर्ण राज्यात त्यांच्या कर्तृत्वाने लोकांपुढे पुढे एक ओळख करून दिली. भविष्यातील धडाडीचा कार्यकर्ता किंवा नेतृत्व म्हणून कै. गोविंदराव आदिक यांच्याकडे पाहिले जायचे. माझ्याकडे त्यांच्या संदर्भातील माहिती आहे. सर्वांकडेच त्यांच्या संदर्भातील माहिति कमी अधिक प्रमाणात आहे. माहितीवरून लक्षात येते की, असे कोणतेही क्षेत्र नाही की ज्यामध्ये त्यांनी काम केलेले नाही. त्यांनी कृषी क्षेत्रात तडफेने काम केले, तेवढ्याच तडफेने कामगार क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, युवकांच्या क्षेत्रात, सांस्कृतिक क्षेत्रात सुध्दा काम केले. कै. गोविंदराव आदिक साहेबांनी सर्व क्षेत्रांत तरुण नेतृत्व म्हणून काम केले असे नाही तर आपल्या कर्तृत्वाचा ठसाही कामाच्या माध्यमातून उमटविला.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

त्यांच्याशी आमची ओळख झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात आम्ही असे पहात होतो की, राजकारणामध्ये कै.यशवंतरावजी चव्हाण साहेब, श्री.शरदचंद्रजी पवार साहेब आणि स्वत: गोविंदरावजी आदिक साहेब एकत्रितपणे काम करीत होते. काँग्रेस पक्षाला मजबुती देण्याच्या उद्देशाने आदिक साहेबांनी युवक काँग्रेसच्या माध्यमातून सातत्याने युवक चळवळीमध्ये काम केले. त्यानंतरच्या काळात श्री.शरद पवार साहेब काँग्रेसमधून वेगळे झाले. मात्र गोविंदराव आदिक साहेब काँग्रेस पक्षामध्येच राहिले.

सभापती महोदय, काँग्रेस पक्षाने गोविंदराव आदिक साहेबांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष पद, कृषी मंत्री पद, पाटबंधारे मंत्री पद दिले. पाटबंधारे मंत्री असताना त्या क्षेत्रामध्ये कशा प्रकारे काम झाले पाहिजे, याची अनेक उदाहरणे आज आपल्याला देता येतील. अशा प्रकारचे काम त्यांनी त्यावेळी केले होते.

सभापती महोदय, आपण अनेक कृषी मंत्री पाहिले आहेत. सन्माननीय श्री.एकनाथराव खडसे हे आज कृषी मंत्री आहेत. त्यांचाही या क्षेत्रातील अनुभव दांडगा आहे. गोविंदराव आदिक साहेब कृषी मंत्री असताना ते मंत्रालयापेक्षा शेतकऱ्यांच्या शेतावरच जास्त असायचे. अनेक वेळा ते शेतकऱ्यांच्या शेतात जायचे, त्यांच्याबरोबर बसायचे. शेतकरी कशा प्रकारे काम करीत आहेत, काय करीत आहेत, हे ते पहायचे आणि सातत्याने त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करायचे. एक मंत्री म्हणून शेतकऱ्यांसाठी एवढा वेळ क्वचितच अन्य कोणा मंत्र्यांनी दिला असेल.

सभापती महोदय, माननीय श्री.गोविंदराव आदिक यांनी पक्ष संघटनेचीही जबाबदारी सांभाळली आहे. ते युवक काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी झाले त्यावेळी आमच्या नेत्या माननीय प्रभा राव या प्रदेशाध्यक्ष होत्या. संपूर्ण महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमात आदिक साहेबांची भाषणे व्हायची. त्यावेळी सगळे जण असे म्हणायचे की, खऱ्या अर्थाने एका विचाराने प्रेरित झालेले गोविंदराव आदिक साहेबांसारखे नेतृत्व असावे. कारण ते विचार त्यांच्या भाषणातून सतत ध्वनित होत असत. अशी अनेक उदाहरणे या ठिकाणी देता येतील. किंबहुना अनेकांच्या ती स्मरणात देखील असतील. परंतु, कार्यकर्ता कसा असावा, त्याचे काम कसे असावे, याची जाणीव करुन देणारे नेतृत्व आम्ही त्या काळात त्यांच्या रुपाने अनुभवले आहे. ...2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

सभापती महोदय, श्री.गोविंदराव आदिक यांनी त्यांच्या राजकीय कार्यकाळात अनेक जबाबदाऱ्या पेलल्या. काही काळ त्यांना सत्तेपासून बाजूलाही रहावे लागले. आदिक साहेब पुढे राजकारणात राहतील किंवा नाही, नेमके काय घडेल, असाही प्रश्न त्यावेळी अनेकांच्या मनात निर्माण झाला होता. शेवटी ते काँग्रेस पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले. आदिक साहेबांच्या आयुष्यात त्यावेळी कदाचित काही वेगळा निर्णय झाला नसता तर ते या राज्याचे मुख्यमंत्री सुध्दा झाले असते. एवढी मोठी उंची प्राप्त झालेले हे नेतृत्व होते.

सभापती महोदय, तरुण वयात आपल्या कामाचा ठसा उमटविल्यानंतर नेतृत्व कसे असावे, याचा संदेश गोविंदराव आदिक साहेबांच्या कार्यातून राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना मिळाला आहे. गोविंदराव आदिक साहेबांच्या दु:खद निधनाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, त्यांचे राज्यातील सर्व कार्यकर्ते, जनता, किंबहुना ज्यांना ज्यांना विकासाची गोडी आहे, त्यांच्याबद्दलची माहिती आहे, त्या सर्वांना दु:ख झाले आहे.

सभापती महोदय, गोविंदराव आदिक साहेबांनी राज्यसभा सदस्य, विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्य म्हणूनही आपल्या संसदीय कामाचा ठसा उमटविला आहे. त्यांच्याकडून प्रत्येक भाषणातून मिळणारे मार्गदर्शन सतत ऐकत रहावे, असेच वाटत आले आहे. परंतु, आता आपल्या सर्वांनाच त्यांच्या मार्गदर्शनापासून वंचित रहावे लागणार आहे. त्यांचे मार्गदर्शन आपल्याला अधिक काळ झाले असते तर या राज्याच्या राजकारणाला वेगळी दिशा मिळू शकली असती, याची खंत तुम्हा, आम्हा, सर्वांनाच आहे.

सभापती महोदय, कै.डॉ.बळीराम हिरे हे अनेक वर्षे या राज्याच्या राजकारणात होते. ते ऊर्जा मंत्री असताना चंद्रपूर येथील पॉवर प्लँटचे उद्‌घाटन झाले होते. त्या कार्यक्रमाला तत्कालीन पंतप्रधान आणि आमच्या नेत्या स्व.इंदिराजी गांधी या उपस्थित होत्या. त्यावेळी अशी चर्चा असायची की, दिल्लीच्या जवळचे आज कोणी असेल तर ते डॉ.बळीराम हिरे आहेत व ते भविष्यात मुख्यमंत्री होतील. अशा प्रकारची उंची प्राप्त केलेले हे नेतृत्व होते. जी जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली, ती अतिशय कौशल्याने हाताळणाऱ्या या नेतृत्वाने 3 वेळा विधानभेचे आणि एकदा विधान परिषदेचे सदस्य म्हणूनही काम केले आहे.

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

सभापती महोदय, आम्ही सन 1985 मध्ये विधानसभेत आलो. त्या काळात, त्यापूर्वीच्या काळात आणि त्यानंतरच्या काळात देखील डॉ.बळीराम हिरे यांचे नेतृत्व कधी राज्याच्या नजरेआड गेले आहे, असे झाले नाही. सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे असामान्य नेतृत्व म्हणूनही सातत्याने त्यांच्याकडे सर्वांनी पाहिलेले आहे.

सभापती महोदय, कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील हे अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे होते आणि ते माझे अतिशय घनिष्ट मित्रही होते. मी ज्यावेळी प्रदेश युवक काँग्रेस अध्यक्ष होतो त्यावेळी मी त्यांना जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्षपदाची जबाबदारी दिली होती. त्यांनी त्यांच्या जिल्ह्यात अनेक कार्यक्रम आयोजित केले. अकलुज, पंढरपूर अशा अनेक ठिकाणी त्यांनी सभा आयोजित केल्या. त्या सभा प्रचंड ताकदीच्या होत्या. युवकांचे नेतृत्व कसे असावे, हे त्यांच्या या संपूर्ण कार्यातून दिसून आले. अतिशय कमी वयात साखर कारखानदारी, शिक्षण क्षेत्रातील काम, राजकीय क्षेत्रातील काम, राजकारणातील काम त्यांच्याएवढे कोणी करु शकलेले नाही. दुर्दैवाने नंतरच्या कालावधीत त्यांची तब्येत खालावत गेली. ते विधानपरिषदेचेही सदस्य होते. आपल्या शारीरिक व्याधींवर मात करण्याचा प्रयत्न ते अनेक वर्षांपासून करीत होते. ज्यावेळी ते अशा अवस्थेत भेटायचे त्यावेळी आम्हाला दु:ख व्हायचे. तडफेने काम करणाऱ्या या एका तरुण कार्यकर्त्याची झालेली ही स्थिती आम्हाला बघवत नव्हती व त्यामुळे अतिशय दु:ख व्हायचे. अशा या जिवलग मित्राबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. ज्यावेळी ते जिल्हाध्यक्ष होते त्यावेळी अमूक एका कार्यकर्त्याला आमदार करायचे, जिल्हा परिषद सदस्य करायचे, असे त्यांनी सांगितल्यानंतर तो विषय तेथे संपायचा. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्याकडे कार्यकर्त्यांचा मोठा संच होता. माननीय श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांचे संपूर्ण राजकीय सामर्थ्य सांभाळण्याची जबाबदारी या तरुणावर होती व ती जबाबदारी ते अतिशय कौशल्याने सांभाळत असत.

सभापती महोदय, कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या रुपाने एक तरुण नेतृत्व आपल्यातून निघून गेले आहे. अशा प्रकारचे बरोबरीचे नेते ज्यावेळी आपल्यातून निघून जातात त्यावेळी दु:ख

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

होते. यापुढेही अनेक वर्षे ते नेतृत्व करु शकले असते. परंतु, ते आज आपल्यातून निघून गेले आहेत, याचे दु:ख तुम्हा, आम्हा, सर्वांनाच झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्याशी ज्यांचा अधिक संबंध आला, ज्यांनी त्यांचे काम जवळून पाहिले आहे, त्यांचा जो प्रचंड मोठा मित्र परिवार आहे, त्यांचे स्वत:चे कुटुंब आहे आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते आहेत, त्या सर्वांना त्यांच्या जाण्याने आघात झाला आहे. त्यांचे वय कमी होते आणि अशा कमी वयात त्यांना अचानक निघून जावे लागले, याचे दु:ख निश्चितपणे आहे.

सभापती महोदय, कै.शांताराम पांडुरंग करमळकर हे जनसंघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते होते. पूर्णवेळ कार्यकर्ता कसा असतो, हे सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील यांना चांगले माहीत आहे. हा फार मोठा त्याग आहे. प्रत्येक संघटनेचा कार्यकर्ता आपल्या परीने संघटनेचे काम करीत असतो. एखाद्या विचाराने पछाडल्यानंतर पूर्णपणे वाहून घेणे आणि त्यासाठी सतत 10-12 वर्षे आपल्या कुटुंबापासून दूर राहून संघटनेचे काम करणे, यासाठी मनाची प्रचंड मोठी ताकद लागते आणि फार मोठा त्यागही करावा लागतो.

सभापती महोदय, श्री.करमळकर हे सन 2000 मध्ये या सभागृहाचे सदस्य असताना आम्ही मंत्री किंवा राज्यमंत्री म्हणून काम करीत होतो.

यानंतर श्री.वि.खर्चे........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात ते अत्यंत चांगल्या प्रकारे प्रश्न उपस्थित करीत होते. बऱ्याच प्रश्नांची आम्ही सकारात्मक उत्तरे देऊन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत होतो. प्रश्न विचारल्यावर त्यासंदर्भातील अधिक माहिती देण्याचा आम्ही प्रयत्न करीत होतो. बऱ्याच विषयांवर आमची चर्चा होत होती. त्यातून प्रश्न सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत होतो. अशा एका चांगल्या नेतृत्वाला आपण मुकलो आहोत.

सभापती महोदय, कै.शिवाजीराव मारुतराव पाटील, माजी विधानसभा सदस्य हे विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव येथील होते. त्यांचे शिक्षण बी.ए.,बी.टी.पर्यंत झाले होते. ते शिक्षक मतदारसंघातून विधान परिषदेवर 1984 मध्ये निवडून आले होते. त्या सहा वर्षाच्या काळातील दोन तीन वर्षाच्या कालावधीत मी विधानसभेचा आमदार होतो. ते अत्यंत अभ्यासू आमदार असल्यामुळे त्यांचे नाव सभागृहाच्या बाहेर आम्हाला व लोकांना चांगले परिचित होते. त्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने कामे केली होती. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यादानाचे काम केले होते. नाशिक जिल्ह्यात त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारची माध्यमिक शाळा उभारली आहे. अशा प्रकारे राज्यातील चांगले नेतृत्व आपल्या दृष्टीआड झाले आहेत, त्याचे दु:ख तुम्हा आम्हा सर्वांना होत आहे.

सदनाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो. माझ्यावतीने माझ्या पक्षाच्यावतीने माझ्या पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांच्यावतीने मी सर्वांना आदरांजली अर्पण करतो व माझे भाषण संपवितो.

-------------

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियमाला अपवाद करुन आज आपण मला शोक प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली आहे त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

सभापती महोदय, कै.गोविंदराव वामनराव आदिक, यांच्या सोबत मी स्वतः काम केले आहे. कै.गोविंदराव आदिक हे कष्टकऱ्यांचे, सर्वसामान्य शेतकऱ्यांचे नेते होते. त्यांच्या सोबत 20 ते 25 वर्षे काम करण्याची मला संधी मिळाली आहे, त्यामुळे त्यांच्या विषयीच्या भावना व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे. अनेक प्रकारचे नेतृत्व मी माझ्या राजकीय जीवनात पाहिले आहेत. काही उत्तुंग नेतृत्व आजही अस्तित्वात आहेत. परंतु अशी काही नेतृत्व समाजात तयार होतात की, ती उंचीनेच मोठी नसतात तर ती त्यांच्या कर्तुत्वाने मोठी असतात. अशा प्रकारे कै.गोविंदराव आदिक हे सर्वसामान्य लोकांचे, कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे नेतृत्व होते. उपेक्षित कामगार असतील, असंघटित कामगार असतील, घरामध्ये काम करणाऱ्या महिला असतील, या सर्व कामगारांचे प्रश्न सोडविताना वेगळा ठसा उमटविणारे नेतृत्व म्हणजे कै.गोविंदराव आदिक हे होते. मी मला भाग्यवान समजतो की, काँग्रेस पक्ष एकत्र असताना आणि काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस असे दोन पक्ष वेगळे झाले त्या काळात देखील त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मला मिळाली होती. अनेक वेळा असे होते की, एखादी व्यक्ती ज्या स्थानावर बसते, त्यावेळी त्या स्थानाचे महत्व ती व्यक्ती वाढवित असते.

सभापती महोदय, अलीकडील काळात राजकीय पक्षामध्ये शिबिर संस्कृती बंद झाली आहे, आता राजकीय पक्षाचे एक दिवसाचे शिबिर घेण्यात येते, शिबिराला सकाळी आले की, सायंकाळी परत जातात, अशा प्रकारची शिबिरे आता आपण पाहत आहोत. मला आठवते की, सन 2002 मध्ये सात दिवसांचे शिबिर कार्ला येथे कै.गोविंदराव आदिक यांनी आयोजित केले होते. सात दिवस ते हेडमास्तरांसारखे वागत होते. सकाळी सात वाजता उठून तेथील सर्व परिसर झाडू मारुन आम्ही स्वच्छ करीत होतो. मला आठवते की, आपण लहानपणी प्रभात फेरी काढत होतो. तो काळ स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळेचा होता. प्रभाग फेरी काढताना त्यावेळी गावाची साफसफाई करण्यात येत होती. त्यावेळी माझ्या मनावर जे कोरले होते ते सन 2002 मध्ये आमच्या नेत्यांनी सर्व

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

कार्यकर्त्यांकडून करुन घेतले होते. त्या क्षणांचा उल्लेख करताना मला खरोखर आनंद होतो. शालेय जीवनापासून मी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता व नेता राहिलो आहे. काँग्रेस पक्षाची त्रिसुत्री, पंचसुत्री असेल, गांधीजीच्या काळापासून काँग्रेस पक्षासाठी जेव्हा जेव्हा संघर्षाचा काळ आला तो सर्व इतिहास मला कार्ला येथील सात दिवसाच्या शिबिरात आत्मसात करावयास मिळाला होता. त्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजतो.

सभापती महोदय, आज गिरणी कामगारांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. गिरणी कामगारांची परवड चालू आहे. त्यावेळी आमच्या या कामगार नेत्यांने सांगितले होते की, काळाची पावले ओळखून याबाबत आधुनिकीकरण करावे लागेल. त्यासाठी त्यांनी प्रचंड लढा दिला व त्यामध्ये दुर्दैवाने पुढे काहीही घडले नाही, ही गोष्ट खरी असली तरी या नेत्यांने काळाची पावले ओळखून जो बदल सूचविला होता तो मला आजही आठवतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र कृषक समाजाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न व त्यांच्या अडचणी सोडविताना त्यांनी कधीही असा विचार केला नाही की, आपण सत्तेत आहोत, आपण मंत्री आहोत. त्यांनी कृषक समाज व इंटक संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात 34 दिवस निर्धार यात्रा काढली होती. त्या यात्रेत सहभागी होण्याची मला संधी मिळाली होती. त्यावेळी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात आम्ही फिरलो होतो. त्यातील एक प्रसंग मला येथे सांगावयाचा आहे. कै.गोविंदराव आदिक कृषी मंत्री असताना कोकण कृषी विद्यापीठात काही कंत्राटी कामगार होते. पावसाळ्यात काजू व आंबा लागवड करण्यासाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. पाच ते सहा महिन्यानंतर त्यांना काम मिळत नसे. ती माणसे कायमस्वरूपी तेच कामे करीत होती, त्यांना दुसरे काम करता येत नाही. अशा कामगारांचा प्रश्न घेऊन मी त्यांच्याकडे गेलो त्यावेळी ते मला म्हणाले होते की, भाई मी कृषी मंत्री आहे, हे लक्षात ठेवा व इतरांप्रमाणे चार्टड ऑफ डिमांड देऊ नको. काय करावे लागेल ते नेमके सांगितले तर त्यामध्ये मला काही तरी करता येईल. याबाबत मी मुद्दाम उल्लेख करतो की, देशात व राज्यात अशा प्रकारे उपेक्षित घटक खूप मोठ्या प्रमाणात आहेत. आमदार निवासातील कामगारांच्या व्यथा वेगळ्या प्रकारच्या असल्या तरी देखील त्या तशाच आहेत. त्यावेळी मी माझ्या नेत्यांना एवढेच म्हणालो होतो की, 37 व 42 रुपये पगारावर त्यांची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H-4

VVK/ प्रथम श्री.रोझेकर... 14:10

श्री.भाई जगताप...

घरे कशी काय चालतील ? याबाबत काय करता येईल ते पहावे. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, राज्यात किमान वेतन कायदा आहे त्यानुसार त्यांना वेतन दिले तर त्याचा काही तरी फायदा त्यांना होईल. मी आपणाला नम्रपणे सांगतो की, आमच्या नेत्याने एका मिनिटात त्यासंदर्भातील निर्णय घेतला होता. कारण त्यांना या विषयाचे गांभीर्य किती आहे याची माहिती होती. यामध्ये शासनाचे नुकसान होत नव्हते. शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर कामे होत असतात. आमच्या नेत्यांनी असा चांगला निर्णय घेऊन त्या कामगारांना दिलासा दिला होता. कै.गोविंदराव आदिक हे अतिशय अभ्यासू होते. कोणत्याही विषयाचा ते अत्यंत बारकाईने अभ्यास करीत असत, असा आमचा नेता आज महाराष्ट्रातून हरपला आहे, त्यांच्या जाण्यामुळे सर्वांचेच नुकसान झाले आहे. खऱ्या अर्थाने कामगार क्षेत्राचे जास्त नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, इंटक या संघटनेची स्थापन 1885 मध्ये झाली आहे. मी इंटकचा जनरल सेक्रेटरी असताना त्यांच्याबरोबर राज्यात व देशात काम केले होते. आमच्यात काही तात्विक मतभेद झाले होते. केंद्रीय नेतृत्वाने काही अयोग्य निर्णय घेतला होता, त्यावेळी आम्ही दोघे त्या नेतृत्वासमोर उभे राहिलो होतो व त्यांना आम्ही सांगितले होते की, असे करणे बरोबर होणार नाही. त्यावेळी आम्ही माननीय श्रीमती सोनिया गांधी पक्षाध्यक्षा यांची भेट घेतली. त्या विषयात त्यांनी हस्तक्षेप करुन तो विषय मिटविला होता. कै.गोविंदराव आदिक यांच्यामुळेच फक्त हा विषय मिटू शकला होता. या विषयाबाबत अनेक राज्यात फक्त धुसफूस निर्माण झाली होती. परंतु त्याबाबत कधीही नोंद घेतली गेली नाही. हे मला मुद्दाम येथे सांगावेसे वाटते. कै.गोविंदराव आदिक यांच्या शेवटच्या काळात त्यांना भेटण्यासाठी मी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. ते व्हेंटिलेटरवर होते, त्यांना पाहून मला खूप वेदना होत होत्या.

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप..........

मी त्यांना बाहेरुनच बघितले आणि त्यांच्या मुलाला भेटलो. त्यावेळी मला त्यांचा शेवटचा प्रवास सुरु झालेला आहे, असे जाणवले. हे सर्व बघून मनाला प्रचंड वेदना होत होत्या. परंतु, आपणा सर्वांना ज्ञात आहे की, जो जन्माला येतो त्याला कधी तरी जायचे असतेच. कै.गोविंदराव आदिक आपल्यातून अवेळी निघून गेले. त्यांचे रविवार, दिनांक 7 जून, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना माझ्या वतीने व माझ्या पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या विषयी अनेक सन्माननीय सदस्य बोलले. कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांना राज्यातील विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील दिपस्तंभ म्हणावयास पाहिजे. त्यांचे सोमवार, दिनांक 6 जुलै, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना माझ्या वतीने व माझ्या पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.बळीराम हिरे आमचे नेते होते. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. आम्ही नशिबवान आहोत की, त्यांचा आदर्श आमच्या समोर होता व त्यांच्याकडून आम्हाला अनेक गोष्टी शिकावयास मिळाल्या. त्यांचे शनिवार, दिनांक 11 एप्रिल, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना माझ्या वतीने व माझ्या पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.शांताराम करमळकर यांच्या विषयी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यांनी विशिष्ट विचारांचा ध्यास घेतला होता आणि त्या विचारांसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. त्यांचे सोमवार, दिनांक 15 जून, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना माझ्या कुटुंबीयांच्या वतीने व माझ्या पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.शिवाजीराव पाटील सन 1984 मध्ये पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांचे मंगळवार, दिनांक 9 जून, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी सर्व दिवंगत सदस्यांना माझ्या कुटुंबीयांच्या वतीने व माझ्या पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो व माझे दोन शब्द संपवितो.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी कै.गोविंदराव वामनराव आदिक, डॉ.बळीराम वामन हिरे, कै.प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील, कै.शांताराम पांडुरंग करमळकर, कै.शिवाजीराव मारुतराव पाटील यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

कै.गोविंदराव आदिक यांची कामगारांचा, कष्टकऱ्यांचा, शेतकऱ्यांचा, शेतमजुरांचा कर्तबगार नेता म्हणून ओळख होती. कामगारांचे दु:ख उराशी घेऊन त्यांच्या जीवनामध्ये समाधानाचा मळा कसा फुलवावा यासाठी ते सतत प्रयत्न करीत असत. कै.गोविंदरावजी आदिक यांची आणि माझी बंगलोर येथे पहिल्यांदा भेट झाली. त्यावेळी मी लोकसभेचा सदस्य होतो आणि ते राज्यसभेचे सदस्य होते. त्यावेळी काँग्रेस आणि रिपब्लिक पक्षाची युती होती आणि आमच्या पक्षाचे चार खासदार निवडून आले होते. आमची संसदीय समिती बँगलोर येथे दौऱ्यावर गेली होती. कै.गोविंदराव आदिक दुसऱ्या संसदीय समितीचे सदस्य होते. त्यावेळी दौऱ्यावर असताना आमची बंगलोर येथे पहिल्यांदा भेट झाली. त्यावेळी आम्हाला कै.गोविंदराव आदिक यांच्या स्वभावाची, वक्तृत्वाची, नेतृत्वाची आणि कर्तृत्वाची प्रचीती आली. त्यांचे प्रचंड वाचन होते. आम्ही जवळपास दोन तास चर्चा केली. मी प्राध्यापक असल्यामुळे चर्चा करताना त्यांना विशेष आनंद वाटला. त्यावेळी कै.गोविंदराव आदिक कामगार, कृषी, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ असल्याचे मला जाणवले. कै.गोविंदराव आदिक हे गतीमान व धडाडीचे नेतृत्व होते. त्यांनी विधानसभेचे सदस्य, विधानपरिषदेचे सदस्य, मंत्री आणि खासदार म्हणूनही कार्य केलेले आहे. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला होता, हे कोणीही विसरु शकणार नाही.

मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी काँग्रेस पक्ष विभक्त झाला नव्हता त्यावेळी ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. त्यावेळी आमच्या पक्षाची आणि काँग्रेस पक्षाची युती होती. त्यामुळे माझा कामानिमित्त त्यांच्याशी संपर्क येत होता. ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाल्यानंतर श्रीरामपूर येथे त्यांचा सत्कार करण्यात आला. मित्रपक्ष म्हणून मला देखील त्या कार्यक्रमासाठी बोलाविण्यात आले. त्यांच्या कर्तृत्वाने त्यांनी जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा प्रचंड विश्वास संपादन केला होता. कार्यकर्त्यांचे मोहळ सतत त्यांच्या अवतीभोवती असायचे, हे आम्ही



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे ..............

स्वतः बघितले आहे. मघाशी आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी बोललो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब देखील शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी बोलले. काल परवा जे शेतकऱ्यांचे कैवारी होते, ते आता शेतकऱ्यांचे वैरी झाले. परंतु, सत्तेत असताना देखील शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून काम करणारे कै.गोविंदराव आदिक आम्ही बघितले आहेत. असा हा शेतकऱ्यांचा कैवारी रविवार, दिनांक 7 जून, 2015 रोजी आपल्यातून निघून गेला, ही दु:खाची बाब आहे. त्यांचे राजकीय कर्तृत्व आपणा सर्वांना माहीत आहे. त्यामुळे त्यांच्या राजकीय कर्तृत्वाविषयी मी बोलण्याची आवश्यकता नाही. त्यांनी एस.टी. कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, राष्ट्रीय मिल मजदूर संघटाचे अध्यक्ष, इंडियन नॅशनल ट्रेड युनियनचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्य केले आहे. त्यांचा अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी तसेच, कामगार संघटनांशी निकटचा संबंध होता. असे गतीमान व धडाडीचे नेतृत्व आपल्यातून निघून गेले. मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना श्रद्धाजली अर्पण करतो.

कै.बळीराम हिरे यांनी भाऊसाहेब हिरे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपल्या जीवनाची वाटचाल केली. ते नाशिक जिल्ह्यातील दाभाडी मतदारसंघातून तीन वेळा महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक, सहकार क्षेत्रात अत्यंत चांगले कार्य केलेले आहे. त्यांचे नेतृत्व केवळ नाशिक जिल्ह्यासाठी नाही तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी परिणामकारक ठरणारे होते. त्यांचे शनिवार, दिनांक 11 एप्रिल, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना माझ्या पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील हे पश्चिम महाराष्ट्रातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राला आदर्श ठरावे, अशा प्रकारचे व्यक्तिमत्व होते. अकलुज येथे 5-6 महिन्यांपूर्वी एक सभा झाली होती. त्या सभेला माझ्यासह कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील, माननीय श्री.विजयसिंह मोहिते-पाटील उपस्थित होते. ते सभागृहाचे सदस्य असताना आमची भेट होत होती. ते अत्यंत दिलदार होते. सहकार क्षेत्राचा जास्तीत जास्त विकास कसा होईल, सहकार क्षेत्रातील दूध उत्पादक शेतकरी, साखर कारखानदार किंवा अन्य लोकांना मदत कशी करता येईल यासाठी ते सतत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे..........

प्रयत्न करीत असत. अशा या उमद्या नेत्याचे सोमवार, दिनांक 6 जुलै, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.शांताराम करमळकर यांनी हिंगोली नगरपरिषदेचे सदस्य म्हणून काम केले होते. ते कोणत्या विचारांशी संबंधित होते हा वेगळा भाग आहे. आम्हाला न पटणाऱ्या विचारांशी ते संबंधित होते. परंतु, ज्याला आपण समर्पण म्हणतो म्हणजे एखादा विचार स्वीकारल्यानंतर त्या विचारासोबत समर्पित भावनेने काम करणे, मग तो संघ असेल, जनसंघ असेल, या सारख्या पक्षासोबत, विचारांसोबत ते राहिले आणि त्यांनी आपल्या समोर एक आदर्श घालून दिला, हे दखील आपल्याला लक्षात घ्यावे लागेल. त्यांचे सोमवार, दिनांक 15 जून, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना माझ्या पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.शिवाजीराव पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य केलेले आहे. त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून कार्य केले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कै.शिवाजीराव पाटील यांनी फुले, शाहू, आंबेडकर, शिवाजी महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शैक्षणिक क्षेत्रात गौरवास्पद कार्य केलेले आहे. ते आज आपल्यातून निधून गेल्यामुळे आपण त्यांच्या कार्याला मुकलो आहोत.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

आजच्या या प्रसंगी सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहाच्या दिवंगत सदस्यांबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे, त्या सर्व दिवंगत सदस्यांना मी माझ्या पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने, रिपब्लिकन जनतेच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो. धन्यवाद.

-------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सर्वश्री गोविंदराव आदिक, प्रतापसिंह मोहिते-पाटील, डॉ.बळीराम हिरे, सर्वश्री शांताराम पांडुरंग करमळकर, शिवाजीराव मारूतराव पाटील यांच्या निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्या सर्व दिवंगत सदस्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

स्व.गोविंदराव आदिक यांचा उल्लेख करावयाचा झाला तर शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे अभ्यासक आणि कामगारांच्या प्रश्नाचा खंदा नेता; सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्राला जाणणारे संवेदनशील व्यक्तिमत्व म्हणून केला पाहिजे. सभागृहात कृषी, विधि व न्याय मंत्री म्हणून त्यांचा परिचय करुन देण्यात आला होता. त्यापूर्वी 1993 ते 1998 या काळात पुण्यात माध्यमाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या 'युनिक फिचर्स' जे आता अनुभव मासिक प्रकाशन करतात त्यांच्यामुळे माझा त्यांच्याशी परिचय झाला. त्यांनी एस.टी.मधील कामगार महिला तसेच इंटक मधील महिला विभागाच्या कामाची माझ्यावर जबाबदारी टाकली होती. लातूरमध्ये भूकंप भागातील शेतमजूर महिलांसोबत काम करीत असताना त्यांना स्वत:च्या कामगार चळवळीचा अनुभव होता, त्याची त्यांनी माहिती दिली. विशेष सांगावयाची बाब म्हणजे कै.यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्या मनावर फार प्रभाव होता. काही वेळेला अनौपचारिक चर्चेमधून जून्या कार्यकर्त्यांकडून जे मांडले जायचे त्यामधून कै.यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्यावर मानसपुत्र किंवा पुत्रवत प्रेम केले. कै.यशवंतराव चव्हाणांच्या परिवारामध्ये राजकीय कायकर्ते म्हणून गोविंदराव आदिक यांचा समावेश होता. ते उत्तम वक्ते तर होतेच, परंतु नगर जिल्हयामधील राजकारणामध्ये काम करीत असताना विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रामध्ये त्यांच्या कार्यकर्त्यांचे नेटवर्क होते.

सभापती महोदय, त्यांनी माझ्या काही लेखांचे वाचन केले होते. ज्यावेळी आपली चर्चा होते त्यावेळी एखादा मनुष्य फारसा विचार न करता वेगळया प्रकाराने काही कॉमेंटस् करतो. तशा प्रकारे माझे पुस्तक वाचल्यानंतर त्यांनी मला सांगितले होते की, मी जाईन त्यावेळी तुम्ही माझ्यावर लेख लिहा. सहजगत्या किती तरी कार्यकर्ता बोलतात, त्यावेळी आपण त्या प्रश्नाचा कधी विचार केलेला नसतो. परंतु आज श्रध्दांजली व्यक्त करीत असताना मला असे वाटते की, ज्या कामगारांच्या प्रश्नावर किंवा शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ते सातत्याने आवाज उठवित होते त्या कामाला गती देणे, वेग देणे हे सर्व पक्षाचे मिळून एकत्रित कर्तव्य आहे असे मी मानते. मी शिवसेना पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांचे सोलापूर जिल्हयातील सहकार क्षेत्रात तसेच ग्रामीण भागात त्यांच्या कामाचा मोठा पाया होता. मोहिते-पाटील परिवारासोबत आणि काँग्रेस पक्षासोबत त्यांना स्वतःला एक जनाधार होता. स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या बरोबर बांधाच्या पलीकडे जाऊन तटबंदी मोडली तेव्हा प्रतिसाद देण्यामध्ये त्यांचा सहभाग होता. त्यावेळी शिवसेना पक्ष प्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांच्याबरोबर कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांचे अकृत्रिम स्वस्र्याचे संबंध होते. गेली काही वर्षे त्यांची तब्येत बरी नव्हती. अस्वस्थ वाटत होते. त्यांच्या कुटुंबाने त्यांची खूप सेवा केली. त्यांचे चिरंजीव धवलसिंह मोहिते-पाटील हे शिवसेना पक्षासोबत काम करतात. त्यांच्या संपूर्ण संघर्ष आणि विकासाच्या प्रवाहाला त्यांनी शिवसेना पक्षाशी जोडले आहे. केवळ राजकीय भूमिकेतून नव्हे तर सहकार क्षेत्राला न्याय देण्यासाठी तगमग असणारे नेतृत्व या नात्याने त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सोलापूर जिल्हयामध्ये त्यांनी चांगले काम केले. विशेषतः त्यांनी भारतीय जनता पक्षातर्फे लोकसभेची निवडणूक लढविली. त्या निवडणूक प्रचारासाठी प्रचंड अशा सभा सोलापूर भागामध्ये झाल्या. त्यातून वेगळया प्रकारचा राजकीय इतिहास त्यांनी सोलापूरमध्ये घडविला. मी त्यांच्या निधनाबद्दल पक्षाच्या वतीने श्रध्दांजली व्यक्त करते.

सभापती महोदय, डॉ.बळीराम हिरे यांचे उत्तर महाराष्ट्रात आणि ग्रामीण भागात विकासाच्या दृष्टीने वेगळया प्रकारचे योगदान होते. खास करुन मालेगाव परिसरातील पाण्याच्या आणि सिंचनाच्या प्रश्नावर तेथील जनता जे प्रयत्न करीत आहे त्यामध्ये त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या निधनाबद्दल मी भावपूर्ण आदरांजली व्यक्त करते.

सभापती महोदय, कै.शांताराम बापू करमळकर यांचे हिंगोली आणि सोलापूरसह पुण्यामध्ये देखील वास्तव्य होते. 2002 ते 2006 या काळात ते सभागृहाचे सदस्य होते. त्यावेळी विरोधी पक्षाच्या बाजूला शेवटून दुसऱ्या बाकावरुन अनेक वर्षे शांतपणे काम करीत असताना ते वेगळेच प्रश्न मांडायचे. त्यात जो समाज असंघटित आहे त्या समाजाबद्दलचे प्रश्न ते सातत्याने मांडायचे. त्या मानाने बापू सभागृहात फार कमी बोलायचे. अनेकदा त्यांच्याकडे असणारी माहिती ते माझ्याकडे द्यायचे आणि सांगायचे की, तुम्ही हे प्रश्न जरुर मांडा. त्यांच्या या भावनेतून पुण्यातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे.....

जे प्रश्न माझ्याकडून दुर्लक्षित राहिले असतील ते बापूंच्या माध्यमातून ते शांतपणे मला मार्गदर्शन करायचे. 2002 मध्ये ते या सभागृहामध्ये आले आणि 2006 साली निवृत्त झाले. मधल्या काळात ते पुण्यातील प्रश्न माझ्याकडे सातत्याने पाठवित होते. त्यांचे निधन झाले हे कळल्यानंतर मी काही कार्यालयामध्ये चौकशी केली. तेव्हा कळले की, जेवढी दखल त्यांची घ्यावयास पाहिजे होती तेवढी घेतली गेली नाही, याबद्दल मला खंत व्यक्त करावीशी वाटते. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

सभापती महोदय, कै.शिवाजीराव मारुतराव पाटील यांचा शिक्षणमहर्षी असाच उल्लेख करावा लागेल. हडपसर परिसरात मी ज्यावेळी काम करीत होते, त्यावेळी आमदार इतका साधा असू शकतो हे त्यांच्याकडे पाहिल्यानंतर जाणवत असे. मी नुकतीच विद्यार्थी चळवळीतून काम करावयास लागले त्यावेळी साधा कार्यकर्ता असणारा शिक्षक आमदार असे त्यांचे व्यक्तिमत्व पहावयास मिळाले. वेगवेगळे विषय मांडण्याची संधी त्यांनी साधली होती. एक महत्वाचे वाक्य मला याठिकाणी उद्धृत करावयाचे आहे. जिवंत असताना लथ्था देती, मरता घेती खांद्यावरती. अशा व्यक्तिमत्वाच्या कारकिर्दीमध्ये जे काही मतभेद झाले असतील, त्यांच्याशी प्रत्यक्षात कसे वागलो ते सर्व गंगार्पण करावयाचे आहे एवढे मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते. कै.शिवाजीराव मारुतराव पाटील यांना मी श्रध्दांजली अर्पण करते व माझे भाषण पूर्ण करते.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

मी प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील यांच्याबद्दल दोन शब्द बोलणार आहे. मी त्यांच्यासोबत दहा वर्षे जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. माझ्या माळशिरस तालुक्याचे ते नेते होते. आम्ही दोघांनी बरीच वर्षे एकत्रपणे काम केले. अतिशय उमद्या मनाचे, कार्यकर्त्यांना संघटित करणारा नेता म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांचे 6 जुलै, 2015 रोजी निधन झाले त्यावेळी श्रध्दांजली वाहण्याचा योग आला. त्यांच्या अंत्ययात्रेला लाखाच्या आसपास जनसमुदाय उपस्थित होता. स्व. शंकरराव मोहिते-पाटील यांच्यानंतर राजकीय दबदबा निर्माण करण्याची परंपरा राखण्यास ते कारणीभूत ठरले होते. ते विरोधकांना स्वतः जवळ करायचे. कोणतीही घटना कायम मनात ठेवायची नाही असा त्यांचा स्वभाव होता. अनेक कार्यकर्ते त्यांनी घडविले, त्यांना जिल्हा परिषद अध्यक्ष केले, विषय समित्यांचे सभापती केले, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक होण्याची संधी निर्माण करून दिली. ते स्वतः खासदार होते, आमदार होते, मंत्री होते. त्यांनी अनेकांना चांगल्या प्रकारची मदत केली. कारखाने उभे केले, अनेक सहकारी संस्था उभ्या केल्या आणि चांगल्याप्रकारे चालविल्या. त्यांच्या निधनाने माझ्या माळशिरस तालुक्यामध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मी तालुक्याच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, गोविंदराव आदिक, शिवाजीराव पाटील, शांताराम करमळकर आणि डॉ.बळीराम हिरे यांना त्यांच्या निधनाबद्दल सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----

नंतर के.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** सभागृहाचे नेते मा.श्री. एकनाथराव खडसे-पाटील यांनी सर्वश्री. गोविंदराव वामनराव आदिक, डॉ. बळीराम वामन हिरे, प्रतापसिंह शंकररावजी मोहिते-पाटील, शांताराम पांडुरंग करमळकर, शिवाजीराव मारुतराव पाटील यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला आहे. त्यावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे, सन्माननीय गटनेते व सन्माननीय सदस्य यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

कै. गोविंदराव आदिक यांनी श्रीरामपूर एज्युकेशन सोसायटी, अशोक एज्युकेशन संस्था, अशोकनगर ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे संस्थापक, मुळा-प्रवरा इलेक्ट्रिक को-ऑपरेटिव्ह सोसायटी व महाराष्ट्र राज्य शेतकरी-शेतमजूर संघटनेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सुतगिरणी कामगार संघ व महाराष्ट्र राज्य साखर कामगार संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

कै. आदिक यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष, एस.टी.कामगार संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष, इंडियन नॅशनल ट्रेड युनियनचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषी व औद्योगिक विकास महामंडळाचे सदस्य, विनायक सहकारी साखर कारखान्याचे संचालक, गोदावरी सहकारी साखर कारखान्याचे मुख्यप्रवर्तक म्हणूनही कार्य केले होते. महाराष्ट्र राज्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी तसेच अनेक कामगार संघटनांशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांनी शेतकरी, शेतमजूर व असंघटीत कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी विशेष योगदान दिले होते. त्यांचे दिनांक 7 जुन, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

कै. डॉ. बळिराम हिरे यांनी नाशिक जिल्ह्यातील विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष, निमगांव येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन, भाऊसाहेब हिरे स्मारक समितीचे अध्यक्ष, मालेगाव शेतकरी सहकारी संघाचे सदस्य, गिरणा सहकारी साखर कारखान्याचे व नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले होते. नाशिक जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थाशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांचे 11 एप्रिल, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**माननीय सभापती....**

कै. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी सहकार महर्षी शंकररावजी मोहिते-पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष, जनसेवा युवक संघटनेचे संस्थापक, श्रीमती रत्नप्रभा मोहिते-पाटील सहकारी पतसंस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, धनश्री महिला सहकारी पतसंस्था व महिला कामगार संघटना, अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी बँकेचे अध्यक्ष, सदाशिव नगर येथील शंकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे संचालक, महाराष्ट्र विद्युत महामंडळाचे सदस्य; महाराष्ट्र राज्य साखर संघाचे संचालक, सोलापूर जिल्हा परिषदेचे सदस्य व 1992-97 या कालावधीत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते. सोलापूर जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूरला तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. अकलूज-माळशिरस परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी व जनमानसातील लोकनेते अशीच त्यांची प्रतिमा होती. त्यांचे 6 जुलै, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

कै. शांताराम करमळकर यांनी भारतीय विद्यामंदिर हिंगोली, बहि:शाला शिक्षण मंडळ, तसेच आदर्श गणेश मंडळाचे अध्यक्ष, समर्थ ग्राहक संघटनेचे सदस्य, लोकनायक जयप्रकाश नारायण अमृत महोत्सव समितीचे सेक्रेटरी, तसेच महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. कै. करमळकर यांनी हिंगोली नगरपरिषदेचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. त्यांचे 15 जुन, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

कै. शिवाजीराव पाटील यांनी अनेक वर्षे रयत शिक्षण संस्थेमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अध्यापनाचे कार्य केले. या काळात त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने महाळुंगे-पडवळ व हडपसर, जिल्हा पुणे तसेच विंचूर, जिल्हा नाशिक येथे माध्यमिक शाळांच्या इमारती उभ्या केल्या; तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे व महाराष्ट्र राज्य शिक्षण सुधार सल्लागार समितीचे सदस्य, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, पुणे विद्यापीठाच्या विधी सभेचे सदस्य, ऑल इंडिया फेडरेशन ऑफ हेडमास्टर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ व महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते. त्यांचे 9 जुन, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**माननीय सभापती....**

सर्व दिवंगताच्या स्मृतीला मी अभिवादन करतो व भावपूर्ण आदरांजली वाहतो. सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

====

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती :** मी विधान परिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

1. श्री.दीपकराव साळुंखे
2. श्री.रामनाथ मोते
3. प्रा.जनार्दन चांदूरकर
4. ॲड.अनिल परब

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून उद्या मंगळवार, दिनांक 14 जुलै 2014 रोजी दुपारी 12.00 वाजता, पुनः भरेल.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 26 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 14 जुलै 2015 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION